# उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

## समुदाय आरोग्य अधिकारी प्रवेश परिक्षा प्रकियाबाबत

## प्रवेश परिक्षा दि.१६.१०.२०२०

## सुचना

१) अर्जाबाबतच्या हरकती आणि त्रुटी पुर्तता करण्याचा अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या हरकती व त्रुटी यांची नोंद घेऊन, या कार्यालयामार्फत अंतिम यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

२) **दि.१६/१०/२०२० रोजी समुदाय आरोग्य अधिकारी या पदाची प्रवेश परिक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.**

अ) **नशिक जिल्हयाकरीता** अर्ज सादर केलेल्या पात्र उमेदवारांची लेखी प्रवेश परिक्षा ही नाशिक येथील परिक्षा केद्रावर आयोजित करण्यात आलेली आहे.

ब) **अहमदनगर जिल्हयाकरीता** अर्ज सादर केलेल्या पात्र उमेदवारांची लेखी प्रवेश परिक्षा ही अहमदनगर येथील परिक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेली आहे.

क) **धुळे,जळगांव व नंदूरबार या जिल्हयाकरीता** अर्ज सादर केलेल्या पात्र उमेदवारांची लेखी प्रवेश परिक्षा ही जळगांव येथील परिक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेली आहे.

३) प्रवेश परिक्षेचे वेळ व ठिकाण हे प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येत आहे. सदर प्रवेशपत्र उमेदवारांना त्यांनी अर्जात नमुद केलेल्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येत आहेत. जर सदरचे प्रवेशपत्र मिळाले नसल्यास दि.१२/१०/२०२० ते १५/१०/२०२० रोजी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येऊन, उमेदवारांची ओळख ओळखपत्राद्वारे पटवुन Duplicate प्रवेशपत्र उमेदवरांनी प्राप्त करुन घ्यावे. तसेच ओळखपत्राची छायांकित प्रत संबंधित परिक्षा केंद्राच्या जिल्हयाच्या मुख्यालय असलेल्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करुन नोंद करावी.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ) नाशिक जिल्हयाकरीता अर्ज सादर केलेले पात्र उमेदवार यांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ,नाशिक,विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय कंपाऊंड,शालीमार नाशिक**

Scanned with CamScanner

ब) अहमदनगर जिल्हाकरीता अर्ज सादर केलेले पात्र उमेदवार यांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,सीबीएस शेजारी,अहमदनगर**

क) धुळे,जळगांव व नंदूरबार या जिल्हयांकरीता अर्ज सादर केलेले पात्र उमेदवार यांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग जिल्हा परिषद,नवीन इमारत,बळीराम पेठ,जळगांव**

४) परिक्षेसंबंधित इतर सुचना प्रवेशपत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या आहेत. सदयस्थितीमध्ये कोविड-१९ साथीचा प्रार्दुभाव लक्षात घेता परिक्षे दरम्यान उमेदवारांनी घ्यावयाच्या काळजीबाबत प्रवेशपत्रासोबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

५) ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन / महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल चे रजिस्ट्रेशन नुतनीकरण केलेले नाही अशा उमेदवारांनी परिक्षेचा निकाल लागल्यापुसन ते ०३ महिन्याच्या आत नोंदणीचे नुतनीकरण जमा करणे आवश्यक आहे व त्या उमेदवारंनी सोबत जोडलेल्या नमुन्यात हमीपत्र देणे आवश्यक आहे अन्यथा उमेदवाराला प्रशिक्षणादरम्यान अपात्र ठरविले जाईल. ही सवलत नविन रजिस्ट्रेशनच्या उमेदवारांना लागु नाही.

६) समुदाय आरोग्य अधिकारी यांचे यापूर्वी प्रशिक्षण झाले असल्यास, सदर उमेदवारांना या प्रकियेतून अपात्र करण्यात आले आहे. तसेच पुढील प्रकियेत त्रुटी आढळून आल्यास त्यांना कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) सदर भरती प्रकिये दरम्यान कोणतीही पूर्वसूचना न देता उमेदवारांना पात्र/ अपात्र ठरविणे परिक्षेची दिनांक, स्थळ बदल करणे, परिक्षा रद्द करणे व परिक्षा दरम्यान उद्‌भवणाऱ्या सर्व अडचणीचे निरसन करणे याबाबतचे सर्व अधिकार उपसंचालकांनी राखून ठेवले आहेत.

12.10.2021

**उपसंचालक**
**आरोग्य सेवा,नाशिक परिमंडळ,**
**नाशिक**

Scanned with CamScanner